ठाण्यात लघुउद्योजकांवर संकट

समूह पुनर्विकास योजनेसाठी पालिकेकडून जागा रिकामी करण्याच्या नोटिसा

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : ठाण्यातील वागळे इस्टेट भागात महापालिकेकडून समूह पुनर्विकास योजना (क्लस्टर) राबविण्यात येत आहे. परंतु या वागळे इस्टेटच्या 'फेरोड़ाग'कंपाऊंड'मधील १६ लघुउद्योगांना ४८ तासांत जागा रिकामी करण्याची नोटीस महापालिकेने पाठवल्याने येथील उद्योगांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. येथील उद्योगांमध्ये ३५० हून अधिक कामगार कार्यरत असून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. येथील उद्योजकांनी ठाण्याचे आमदार संजय केळकर यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी कोणावरही अन्याय होऊ देणार नसल्याचे सांगत, पालिकेच्या कारभारावर टीका केली.

ठाण्यातील वागळे इस्टेट या औद्योगिक क्षेत्रात लघु उद्योग मोठ्या संख्येने आहे. एकेकाळी या औद्योगिक क्षेत्राला आशियातील सर्वात मोठी लघु उद्योजकांची नगरी म्हणून ओळखले जात होते. येथील लघु उद्योगांवर हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांपासून या औद्योगिक क्षेत्रात आयटी कंपन्यादेखील स्थापन होत आहेत. तसेच काही भागात अतिक्रमण झाल्याने नागरी वस्तीदेखील वाढत आहे. या भागात महापालिकेकडून 'क्लस्टर' योजना राबविण्यात येत आहे. क्लस्टरच्या माध्यमातून येथील रहिवाशांचे याच भागात पुनर्वसन केले जात आहे.

वागळे इस्टेट येथील रस्ता क्र. २२ परिसरात फेरोड़ाग कंपाऊंड असून २००५ पासून या भागात १६ लघु उद्योग आहेत. परंतु फेरोड़ाग कंपनी आणि महापालिकेदरम्यान करार झाल्याने या जमिनीवर कष्टाने उद्योग चालविणाऱ्या उद्योजकांवर कारवाईची टांगती तलवार आहे. 'करारामध्ये ही जागा रिकामी दाखविण्यात आली होती. आम्ही फेरोड़ाग कंपनीकडून रितसर जमीन खरेदी केली होती. आम्ही सर्व उद्योजक वस्तू सेवा करासह इतर कर भरत असतानाही कारवाई का केली जात आहे', असा प्रश्न येथील उद्योजकांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, ४८ तासांत जागा रिकामी करण्याची नोटीस उद्योजकांच्या हाती पडल्यानंतर त्यांनी या संदर्भात 'ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्री असोसिएशन'शी (टिसा) संपर्क साधला. तसेच आमदार संजय केळकर यांच्याकडेही बाजू मांडली. बुधवारी संजय केळकर यांनी पत्रकार परिषद घेऊन पालिकेच्या कारभारावर गंभीर आरोप केले. आम्ही येथील उद्योजकांबरोबर असून त्यांना मारण्याचे काम महापालिका करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

छाया : दीपक जोशी

लघु उद्योजक अर्थकारणातील मोठा कणा आहे, परंतु त्यांना मारण्याचे काम सुरू आहे. क्लस्टरच्या माध्यमातून अचानक नोटीस दिली जाते. 'फेरोड़ाग'बरोबर करार करून तशीच नोटीस पाठविण्यात आली आहे. ही महापालिका लोकांना जगविण्यासाठी आहे की, मारण्यासाठी आहे? कायद्याने काम करणाऱ्या उद्योजकांना अतिव हशारा दिला जात आहेत. ऐच्छिक असल्याशिवाय अधिकृत जागा क्लस्टरमध्ये घेता येत नाही. महापालिकेने यात जबदरस्ती करू नये. सत्ताधारी पक्षातील काही लोक दबाब आणत असतील तर त्या दबावास आम्ही बळी पडणार नाही.

– संजय केळकर, आमदार.

तोडगा काढून न्याय द्यावा : टीस

डॉ. अप्पासाहेब खांबेरे यांच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथील एकही उद्योग विस्थापित होणार नाही अशी ग्वाही दिली होती. त्यामुळे संवेदनीयता देण्यात आलेल्या ४८ तासांच्या नोटिशीबाबतची माहिती त्यांच्या निदर्शनास आली नसावी, या भावनेतून हा विषय त्यांच्यापर्यंत पोहचविण्यात आला आहे. संबंधित लघु उद्योजकांचा क्लस्टर पुनर्विकासाला विरोध नही. मात्र, पुनर्विकासाच्या प्रक्रियेत उद्योग विस्थापित होत असतील तर त्यांचे योग्य पुनर्वसन, पर्यायी जागा आणि उद्योग सातत्य राखण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. संबंधित घटकांशी चर्चा करून सकारात्मक तोडगा काढून त्यांना न्याय द्यावा,' अशी विनंती तरुेच आवाहन करत असल्याचे 'टिसा' संघटनेने स्पष्ट केले.

नसरापूर प्रकरणातील आरोपीची ग्रामस्थांसमोर गुन्ह्याची कबुली

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : नसरापूर अत्याचार प्रकरणात बालिकेवर अत्याचार करून पसार झालेला आरोपी भीमराव कांबळे याला ग्रामस्थांनी पकडले. दोन ग्रामस्थांनी त्याला पकडल्यानंतर त्याने गुन्हयाची कबूली (न्यायबाह्य कबूली) दिली, अशी माहिती एका साक्षीदाराने बुधवारी न्यायालयात दिली.

भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून खून करण्यात आल्याची घटना महाराष्ट्र दिनी घडली. या प्रकरणी पोलिसांनी भीमराव कांबळे (६५) याला अटक केली. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सरकार पक्षाकडून विशेष सरकारी वकील अजय मिसार यांनी ८२ साक्षीदारांची यादी न्यायालयात सादर केली. या प्रकरणात बालिकेचे आई-वडील, आजी, पंचनामा करणारे पंच यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. गुन्हा करून पसार झालेल्या कांबळे याचा ग्रामस्थांकडून शोध घेण्यात आला. दोघांनी त्याला पकडले. तेव्हा त्याने गुन्हयाची कबुली दिली. आरोपीने बालिकेला खाऊ देण्याचे आमिष दाखविले होते. कांबळे याने मिठाई विक्री दुकानातून गाठीशेव घेतली होती.

टिटवाळ्यातील श्री महागणपती रुग्णालयात 'सीटी स्कॅन' सुविधा

सामाजिक कार्यकर्त्या लीना देवस्थळी यांच्याकडून सहकार्य

लोकसत्ता खास प्रतिनिधी

कल्याण : टिटवाळा येथील श्री महागणपती रुग्णालयाला सामाजिक कार्यकर्त्या लिना देवस्थळी यांनी सीटी स्कॅन सवंत्राची सुविधा उपलब्ध करून दिली. या सीटी स्कॅन सुविधेचे उद्घाटन बुधवारी लीना देवस्थळी, हिंदुजा रुग्णालयाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद लेले यांच्या हस्ते करण्यात आले. टिटवाळा शहर, ग्रामीण भागातील रुग्णांना या सुविधेमुळे दिलासा मिळणार आहे.

श्री महागणपती रुग्णालयात सीटी स्कॅनची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना कल्याण, डोंबिवली, ठाणे परिसरात उपचारासाठी जावे लागत होते. आता ही सुविधा लीना देवस्थळी यांच्या प्रयत्नांमुळे उपलब्ध झाल्याने रुग्णालय प्रशासनाने समाधान व्यक्त केले आहे. श्री. यशवंत देवस्थळी यांच्या नावाने हे सीटी स्कॅन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला क्रिएटिव्ह ग्रुप संचालित श्री महागणपती रुग्णालयाचे मुख्य परिचालन अधिकारी विक्रांत बापट, क्रिएटिव्ह ग्रुपचे सदस्य किशोर गवाणकर, अभिजीत जोशी, आनंद हरकरे, डॉ. संकेत पाठारी, डॉ. रुपेश नायक, डॉ. आतिष दीक्षित, डॉ. प्राची दीक्षित, डॉ. हितेंद्र चौधरी उपस्थित होते.

टिटवाळा येथील श्री महागणपती रुग्णालयात सीटी स्कॅन सुविधेचे उद्घाटन करताना लीना देवस्थळी, प्रमोद लेले, विक्रांत बापट.

सरकारी निवासस्थान न सोडल्यास दंड

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : सेवानिवृत्तीनंतर अनेक कर्मचाऱ्यांकडून सरकारी निवासस्थान सोडण्यात येत नाहीत. अशा कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश वित्त विभागाने दिले आहेत. ठरलेल्या कालावधीत सेवा निवासस्थान न सोडल्यास दंडनीय अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात येणार असून तोपर्यंत सेवानिवृत्ती वेतनाची महागाईवाढही रोखण्यात येणार आहे.

सरकारी निवासस्थान रिक्त करण्यासंदर्भातील कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यानुसार निवृत्तीआधी आठ महिने सुलोचोयस परवाना शुल्काबाबत कार्यकारी अभियंता आणल्याकडी नोंदी तपासून संबंधित कार्यालयप्रमुखाकडून थकीत शुल्काबाबतची माहिती मागविली जाते. ही रक्कम कर्मचाऱ्याच्या वेतन आणि भत्त्यांमधून वसूल करण्यात येत असल्याबाबतची माहिती कार्यालयप्रमुखाकडून दिली जाते. जर वेतनामधून ही रक्कम वसूल होत नसल्यास थकीत रक्कम उपदानातून (ग्रॅच्युईटी) वसूल करण्यात येईल.

कर्मचाऱ्यांने सेवा निवासस्थान सोडल्यानंतर कार्यकारी अभियंत्याने १४ दिवसांच्या आत 'ना मागणी प्रमाणपत्र' बंधनकारक आहे. ठरलेल्या कालावधीत हे प्रमाणपत्र न दिल्यास संबंधित कर्मचारी रोखून धरलेल्या उपदानाच्या अतिरिक्त रकमेवर व्याज मिळण्यास पात्र असेल. हे व्याज ८.५ टक्के दराने दिले जाणार आहे.

'टीजेएसबी'चे शरद गांगल संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत

ठाणे : संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थांच्या जागतिक परिषदेत 'टीजेएसबी'चे अध्यक्ष शरद गांगल यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या सहभागामुळे ठाणे आणि देशातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचा जागतिक गौरव झाला आहे. न्यूयॉर्क शहरातील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात २८ आणि २९ मे रोजी आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थांचे जागतिक चर्चासत्र पार पडले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान 'टीजेएसबी'चे अध्यक्ष शरद गांगल यांना मिळाला. 'इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स' अंतर्गत कार्यरत असलेल्या 'इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकिंग असोसिएशन'न यांच्यावतीने या जागतिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'आयसीए'ने शरद गांगल यांना विशेष निमंत्रण देऊन या परिषदेसाठी आमंत्रित केले होते.

OBEROI REALTY
ओबेरॉय रिअल्टी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: कोविड, जिला मराठा, इटरनेशनल बिझनेस पार्क, ओबेरॉय गार्डन सिटी, ऑफ चांदिवली दुतगती महामार्ग, संपेल (पूर्व), मुंबई -४०० ०६३
CIN: L45200MH1998PLC114818; इमेल आयडी: cs@oberoirealty.com;
वेबसाईट: www.oberoirealty.com; टेलीफोन क्र: +९१ २२ ६७७७ ३३३३

सूचना

वार्षिक सर्वसाधारण सभा आणि वार्षिक अहवाल

कंपनीच्या सभासदांची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') गुरुवार, २५ जून २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता ग्रामीणबंधीच्या सूचीत ('सूचना') नमूद केलेल्या व्यवसायासाठी कंपनी कायदा २०१३ मधील लागू तरतुदी व भारतीय सिक्युरिटीज व एक्स्चेंज बोर्ड (सूचिबद्धता बंधन आणि प्रकटन आवश्यकता) अधिनियम, २०१५ सहवाचित कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे विहीत साधारण परिपत्रके क्र. ०३/२०२५, १४/२०२०, १७/२०२० आणि २०/२०२० (यापुढे सामुहिकरीत्या 'उपरोक्त परिपत्रके' म्हणून संबोधित) यांच्या अनुपालनाचे विडीओ कॉन्फरन्सिंग/अन्य दृक श्राव्य माध्यमाद्वे ('व्हिएसी') कंपनीच्या सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय आयोजित करण्यात आली आहे. उपरोक्त परिपत्रकांच्या अनुपालनाचे कंपनीचे आर्थिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक अहवाल (संचालक अहवाल, लेखापरीक्षक अहवाल आणि वित्तीय विवरणपत्रे यासह) सभेच्या सूचना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सभासदांना पाठविण्यात आलेले आहेत ज्यांचे इमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदविले आहेत. उपरोक्त दस्तऐवज कंपनीची वेबसाईट (www.oberoirealty.com) येथे तसेच बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) यांसाठ्या स्टॉक एक्स्चेंज वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेले आहेत. अशा कोणत्याही दस्तऐवजांची भौतिक स्वरूपाची प्रत सदस्यांना हवी असल्यास तशी मागणीची विनंती ते करू शकतात.

ज्या सभासदांनी अद्याप आपले इमेल पत्ते नोंदणीकडे जाहीर नसतील त्यांनी इमेलद्वारे तपशीलवार विवरणिपत्रासाठी कृपया आपल्या इमेल पत्त्यांची नोंदणी करावी ; असे सभासद पुढील तपशील (१) फोलिओक्रि/डिमॅट खाते क्र. (२) दुरध्वनी इमेल पत्ता (सी) (३) पेन्ना मॉर्टगेजेजची (पुढील व मागील बाजू/कलमाद्वारे साक्षरित किंवा एकत्रित अकाऊंट स्टेटमेंटची प्रत (२) पॅनकार्डची स्वसाक्षांकित प्रत व (३) आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत यांच्या स्कॅन प्रती (cs@oberoirealty.com) या ठिकाणी पाठवून त्यांची नोंदणी प्रमाणपत्रे मिळवू शकतात. भौतिक स्वरूपातील समभागांसाठी कंपनी वरील माहितीच्या आधारावर इमेल पत्ते अद्ययावत करील. डिमॅट स्वरूपातील समभाग धारण करणाऱ्या सभासदांनी कृपया त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे त्यांचे इमेल पत्ते अद्ययावत करावेत. सभासदांना विनंती आहे की त्यांनी आपल्या फोलिओज/डिमॅट खाते, जे लागू असेल त्याप्रमाणे, याबाबचे आपले इमेल पत्ते अद्ययावत ठेवावेत.

ज्या सभासदांना लेखापरीक्षण आणि व्यवहार याविषयीची कोणतीही माहिती जाणून घेण्याची इच्छा असल्यास त्यांनी कृपया त्यांच्या प्रश्न cs@oberoirealty.com या इमेल पत्त्यावर एजीएमपूर्वी किमान ७ दिवस आधी पाठवावयास जेणेकरून कंपनी एजीएमच्या / इमेलद्वारे अशा संकाच्चे योग्य निरसन करू शकेल.

इ-मतदान माहिती

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ आणि त्याअंतर्गत बनविलेले नियम, भारतीय सिक्युरिटीज व एक्स्चेंज बोर्ड (सूचिबद्धता बंधन आणि प्रकटन आवश्यकता) अधिनियम, २०१५; चा अधिनियम ४४ सहवाचित उपरोक्त परिपत्रके यांनुसार सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर एजीएमपूर्वी (दूरस्थ इ-मतदान) व एजीएम दरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा कंपनी आपल्या एमएसटीसीद्वारे पुरविले आहे. कंपनीने इ-मतदान सुविधा पुरविण्यासाठी सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांची नियुक्ती केली आहे. इ-मतदानासंबंधी सूचनांच्या तपशीलासाठी कृपया सूचनेचा संदर्भ पहावा. ही सूचना सीडीएसएलची इ-मतदान वेबसाईट www.evotingindia.com येथे देखील उपलब्ध आहे.

दूरस्थ इ-मतदानाची सुरुवात २२ जून २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होईल आणि २२ जून २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता संपेल. दूरस्थ इ-मतदान सीडीएसएलद्वारे २४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यानंतर नि:समर्थ केली जाईल. दूरस्थ इ-मतदानाची पुनरावृत्ती ठरविण्याची निर्णायक तारीख १८ जून २०२६ असेल आणि ज्या व्यक्तीचे या निर्णायक तारखेस कंपनीचे समभाग (भौतिक किंवा डीमॅटमध्ये/स्वरूपात) धारण केलेले असतील अशीच व्यक्ती इ-मतदान सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल. एजीएम सूचनेचे वितरण झाल्यानंतर जी कोणतीही व्यक्ती कंपनीचे समभाग प्राप्त करेल, आणि कंपनीची समभाग होईल तसेच निर्णायक तारखेस म्हणजेच १८ जून २०२६ रोजी भागधारण करीत असेल, अशा व्यक्तीने लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी सूचनेत नमूद केलेली प्रक्रिया पार पाडावी. ज्या सभासदांनी आपले मत दूरस्थ इ-मतदानद्वारे एजीएमपूर्वी दिलेले असेल त्यांनाच एजीएम दरम्यान इ-मतदानाद्वारे मतदानाची अनुमती आहे. ज्या सभासदांनी आपले मत दूरस्थ इ मतदानद्वारे एजीएमपूर्वी दिलेले असेल तरीसुद्धा ते एजीएममधे मत देण्यास अपात्र असतील.

जर तुम्हाला व्हीसी सुविधेबाबत सपोर्ट किंवा समेटण्यास किंवा सीडीएसएल इ-मतदान वेबसाईतची कोणतीही शंका किंवा समस्या असल्यास किंवा काही सहाय्य आवश्यक असल्यास, तुम्ही helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल पाठवू शकता किंवा सीडीएसएल याच्याशी १८०० २१ ०९११ या क्रमांकावर संपर्क साधू शकता. वेबसिमिटेशन, ई-मतदानाविषयी समस्या विद्यापाशाठी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, मंदूस डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ९ विंग, ३४ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०००१३ येथे पाठवू शकता किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल करू शकता किंवा १८०० २१ ०९११ येथे संपर्क साधू शकता.

ओबेरॉय रिअल्टी लिमिटेड करिता
भास्कर ह्रीरामाणी
कंपनी सचिव

स्थळ: मुंबई
दिनांक: ०३ जून २०२६

अर्थ सुरणशी अथवा अन्य कोणत्याही तेथुसारी या सूचनेचे ०४ जून २०२६, रोजी झालेल्यासिवाय एजमध्ये मतदान देईल.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
बैंक ऑफ महाराष्ट्र
मंडळाचे कार्यालय : 'लोकमंगल', १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११००५
शाखेचा पत्ता : सि.स.नंबर ४-५ (जुनेनंबर), पुणेट ८ ते ११, ८७०००, सेक्टर ६७०, सिडको रोड, नाशिक-४२०००१.

तातिळगाडू राज्यातील हैम रोड प्रकल्पात (बांधकाम सुरू आहे) सवलतदारद्वारा बदलीसाठी स्वारस्याची अभिव्यक्तीकरिता आमंत्रण

भारतीय रष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ('प्राधिकरण') तातिळगाडू राज्यात शिक्षण, मिरज, औरंगाबाद इत्यादि ('प्रोजेक्टसाठी') या नावाचा प्रकल्प राबविण्यासाठी विकसित केलेल्या एकात्मिक वीजपारेषणाच्या प्रकल्पासाठी ('प्रकल्प') एका विशेष उद्देश महामंडळ ('सवलतदार') मध्यस्त उद्यम केले.

सवलतदारकडून त्या सर्व कारणासाठी, बैंक ऑफ महाराष्ट्र ('बीओएम') यांनी कर्जदारांच्या संघाच्या वतीने (राष्ट्रीयरूपे, 'कर्जदारे'), मुख्य सवलतीच्या उर्वरित सवलतधारीकडे सवलतधारकाच्या तर्फे कार्य करणे आणि ऐच्छाद्वारेपूर्ण कारणासाठी आणि कर्जदारांची कामगिरी करण्यासाठी, अवलंबन दरीच आणि आर्थिक क्षमता असलेल्या पात्र संस्थेने ('निवडलेली संस्था') अंतरा परवणारदरे एक पादरीचे कोणी प्रक्रिया ('बोली प्रक्रिया') हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे, जे बोली आमंत्रित करेल्या दस्तऐवजात ('बोली प्रक्रिया दस्तऐवज') आणि त्यामध्ये समाविष्ट नमूद केलेल्या अटी व शर्तीवर आहेत.

सदर या संदर्भात, बीओएम सीमित लाईटेड डिलिटेड ('बांधकाम') यांची नियुक्ती प्रक्रिया/आवश्यक कार्यांचा संचालन कर्जदारांना मदत देण्यासाठी आणि निवडा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रक्रिया मदतनाम ('प्रक्रिया सल्लागार') म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

बोली प्रक्रिया, कर्जदारांच्या वतीने, बाहरे प्रकल्पातील सवलतधारकाच्या नावी बदली करण्यासाठी, आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक क्षमता असलेल्या इच्छुक बोलीदारांकडून/बोलीदारांच्या संघाकडून स्वारस्याची अभिव्यक्ती ('ईओआय') आमंत्रित करत आहे. सदर ही अभिव्यक्ती बीओएम आणि कर्जदारांच्या वतीने केलेल्या बोली प्रक्रिया दस्तऐवजात ('ईओआय दस्तऐवज') विहित केलेल्या अनुभवाची मागणी (अशा ऐवज घटना इच्छुक व्यवसाय, व्यवहार, ऐच्छाद्वारे) जी कर्जदार आणि वाणिज्यदारास स्वीकारणे आवश्यक. सवलतधारकाच्या बदली ही कर्जदारे आणि/किंवा कंत्राटदार यांच्याकडे 'जसे आहे तसे आहे', 'ने आहे ने आहे', 'जसे आहे तसे', 'किंवा ने काही आहे ते' आणि 'जोगाजोगी दायित्वाचा' या तत्वावर असेल आणि ती वाणिज्यदारास मंजूरी/संबंधीच्या आणि सक्षम कायदाच्या तरतुदींच्या विरुद्धचे आहेत.

अशाच्या संबंधित तपशील, ईओआय आणि सवलतधारकाने सध्या, तसेच योगायोगी पुढील माहिती आणि कारणासाठी, इच्छुक व्यक्ती वेबसाईटच्या (https://www.bobcaps.in/tenders) वेबसाइटवर भेट द्यावी. निविदा प्रक्रिया दस्तऐवज, ईओआय दस्तऐवज आणि/किंवा निविदा प्रक्रियेबाबत बोलायचे झाल्यास दूरध्वनी/व्हाटसाप्पी, तसेच प्रकल्पाच्या व्यवस्थापनाचे संबंधित पुढील आदानप्रदानाकडे, कृपया या नमूद केलेल्या वेबसाइटवरा निर्माणलेली भेट द्या.

कोणताही इच्छुक पक्षकार ईओआरा (सवलतधारी अधिकाऱ्यांची) ईमेलद्वारे project.alpha@bobcaps.in आणि hengr2828@bank.sbimaharashtra.bank.in यांना हार्डकॉपीसह ऐच्छि निजनयापत्र २ (दोन) कामकाजाच्या दिवसांच्या आत, तसा संदर्भाच्या निवडाच्या तारीखपासून सर्व आणि संबंधित सवलतदारांच्या नोंदणीकडे व्यवस्थापकाकडे व्यवस्थापकी अधिकाऱ्यांची यादी या मजकूरापत्र, जे/ए-मुख्य व्यवसायाच, हिरा बॉयोंट शाखा (सायबेरी) बैंक ऑफ महाराष्ट्र, बुल्डिंग नं. जी-१, तळमजला, बद्रा कंपाऊंड, बिकेसी रोड, मुंबाई-४००००१, महाराष्ट्र, भारत' या पत्त्यावर जमाकरा पाठवीने, पोस्ट किंवा कुरियरद्वारे (स्वतःहा पाठवावीत तोडणीच आणि संबंधित) पाठवू शकतो.

BOBCAPS
An wholly owned subsidiary of Bank of Baroda
बोबकॅप्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : ९०४-ई विंग, ९०४ मजला, पार्थ्वी टेक्नोलॉजी पार्क सी. सी. ३८/३९, जी बांधिव, नोहि कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
वेबसाइट : www.bobcaps.in CIN: U67100MH2021SGOI363443

सही माहितीकरा हो अस्त्यास, कृपया खालील जबाबदारी धंदाचे साथ :

संपर्क व्यक्ती	मोबाईल नंबर	ईमेल आयडी
श्री. सागर भट्ट (बॉक्सॅप)	+९१ ७६६६१२१३१५	project.alpha@bobcaps.in
एजी मैत्री रेड्डी (बॉक्सॅप)	+९१ ९८६७१९१३०३	
श्री. अजित कुमार सिंग (बीओएम)	+९१ ८७६७२७०५०४	hengr2828@bank.sbimaharashtra.bank.in

अस्वीकरण :
सदर ही जाहिरात, बीओएम आणि/किंवा कर्जदारे आणि/किंवा बोबकॅप्स यांनाच्छद्दिन निविदा प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी किंवा दायित्वाची निश्चित करण्याची कोणतीही वचनबद्धता दर्शवत नाही आणि तसे मानले जाणार नाही. बीओएम कर्जदारे आणि बोबकॅप्स हे, निविदा प्रक्रियेच्या दरम्यानही उपस्थित, निविदा प्रक्रियेचा किंवा दिलेल्या सोयीनाही संपादन करण्याचा अधिकार राखून ठेवतात, तसेच कोणतेही कारण न देता, सोयीनाही इच्छितवितीय नोंदणीही आणि/किंवा सदर ठेवतात, किंवा कोणतेही कारण न देता, सोयीनाही इच्छितवितीय नोंदणीही आणि/किंवा सदर ठेवतात, किंवा कोणतेही कारण न देता, सोयीनाही इच्छितवितीय नोंदणीही आणि/किंवा सदर ठेवतात. या संदर्भात कोणताही दावा करण्यास पात्र राहणार नाही.
सदर ही वर्णित निविदा प्रक्रिया दस्तऐवजात नमूद केलेल्या अस्वीकरण आणि वर्णदर्शवत विचारतील आहे.

दिनांक : ०३ जून २०२६
ठिकाण : नागपूर

सही/- अधिकृत स्वाक्षरीकर्ता
बैंक ऑफ महाराष्ट्र, बोबकॅप्सलिमि.

ठाणे महानगरपालिका, ठाणे
सौ.मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था, ठाणे.
इंडियन नर्सिंग कौन्सिल व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मान्यता प्राप्त संस्था
प्रवेश सुचना २०२६ - २०२७

१ ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणा-या ३ वर्ष कालावधीच्या जनरल नर्सिंग व मिडवायफरी प्रशिक्षणाकरीता फक्त स्त्री उमेदवारांकडून पुढील शर्तीनुसार विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

प्रवेशप्रक्रिया

शैक्षणिक अर्हता	महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी (१०+२) परीक्षा कमीतकमी ४०% गुण मिळवून उत्तीर्ण झालेली असावी. विज्ञान शाखेच्या (पी.सी.बी. ग्रुप विषयासह) उमेदवारांना प्राधान्य असेल परंतु विज्ञान शाखेचे पूरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास वाणिज्य व कला शाखेच्या उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्राधान्य दिले जाईल. १२वी (१०+२) परीक्षेत सर्व विषयात मिळालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड केली जाईल.
वयोमर्यादा	उमेदवाराचे वय दिनांक ३१/१२/२०२६ रोजी १७ वर्षे पूर्ण असावे.
प्रवेशासाठी एकूण जागा	तीस (३०) मागासवर्गीय उमेदवारांसाठी महाराष्ट्र राज्य शासन नियमानुसार जागा आरक्षण.
पात्रता	एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% जागा ठाणे महानगरपालिका क्षेत्र व ५०% जागा ठाणे जिल्हा क्षेत्रामध्ये कमीतकमी १५ वर्ष रहिवास असलेल्या स्त्री उमेदवारांसाठी उपलब्ध असतील. त्याकरीता तहसिलदार ठाणे जिल्हा यांचे कडून प्राप्त झालेल्या १५ वर्ष स्थानिक वास्तव्याचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे. ठाणे महानगरपालिका हद्दीतून रहीवास जागांवर योग्य प्रमाणात राखीव प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास ठाणे जिल्ह्यातील पात्र उमेदवारांचा त्या जागांसाठी विचार केला जाईल.
प्रवेश अर्ज शुल्क	खुल्या वर्गातील उमेदवारांकरिता रक्कम रू. १००/- व राखीव उमेदवारांकरिता रक्कम रू. ५०/- इतके आहे. विहीत नमुन्यातील अर्ज मिळविण्यासाठी मा. प्राचार्या सौ., सौ.मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था, ठाणे यांच्या नावे लेखी अर्ज करून सोबत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, १२ वी गुणपत्रीकेची प्रत व स्थानिक वास्तव्याचा दाखला किंवा रेशन कार्डची प्रत व राखीव उमेदवारांनी कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेल्या जातीच्या प्रमाण पत्र इत्यादी कागदपत्रांची छायांकीत प्रत अर्जासोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे.
प्रवेश अर्ज मिळण्याचे ठिकाण	सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था, बि विंग राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय हॉस्टेल बिल्डींग, हंसनगर, खोपट, ठाणे (प). ४००६०१
प्रवेश अर्ज वितरण	दि. ०८/०६/२०२६ ते दि. २०/०६/२०२६ पर्यंत. (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून).
प्रवेश अर्ज स्वीकृतीचा दिनांक	दि.०८/०६/२०२६ ते दि. २३/०६/२०२६ पर्यंत. (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून).
प्रवेश अर्ज मिळण्याची व स्वीकृतीची वेळ	सकाळी १०:३० ते दुपारी ०३:३० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून).
प्रारूप गुणवत्ता यादी प्रसारण	दि. ४/०७/२०२६ दुपारी ०१:३० वाजता संस्थेच्या आवारात व ठाणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केली जाईल.
प्रारूप गुणवत्ता यादी विषयी लेखी आक्षेप स्वीकृत दिनांक	दि.०४/०७/२०२६ ते दि. ०६/०७/२०२६ संध्याकाळी ०३:३० वाजेपर्यंत.
अंतीम गुणवत्ता यादी प्रसारण व प्रत्यक्ष मुलाखतीस पाचारण करण्यात येणा-या उमेदवारांची यादी	दि. ०७/०७/२०२६ दुपारी ०३:३० वाजता संस्थेच्या आवारात व ठाणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केली जाईल.
प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक	दि. १०/०७/२०२६ शुक्रवार रोजी सकाळी ८:०० वाजल्यापासून मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (ओरिजिनल्स) सादर करणे आवश्यक आहे. मुलाखतीस हजर राहण्यासाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही. तसेच मुलाखती संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही व दुरध्वनीद्वारे माहिती दिली जाणार नाही. तसेच सकाळी ११:०० वाजेपर्यंत हजर असलेल्या उमेदवारांचाच विचार केला जाईल.
निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसारण	दि. १४/०७/२०२६ रोजी दुपारी ०१:३० वाजता संस्थेच्या आवारात व ठाणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केली जाईल.
निवड यादी प्रवेश	दि. २७/